# २५ ठाणे लोकसभा - सहा निवडणूक निर्णय अधिकारी
# १४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघ

पत्ता : महामानव शिव शाहू फुले आंबेडकर स्मृती सभागृह, बेथनी हॉस्पिटलच्या बाजूला पोखरण रोड नं २ ठाणे (प) ४००६०६
ईमेल — 146election2024@gmail.com

जा.क्र./निवडणूक/ कावि-178/२०२४ दिनांक- २७/०३/२०२४

**निवडणूक तात्काळ -**

**// प्रेसनोट //**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने २५ ठाणे लोकसभा मतदार संघांतर्गत, १४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघातील निवडणूकीचे कामकाजासंदर्भात सहायक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय, महामानव शिवशाहू फुले आंबेडकर स्मृती सभागृह, बेथनी हॉस्पिटलच्या बाजूला पोखरण रोड नं. २ येथील निवडणूक कार्यालयामध्ये सकाळी ११.०० वा. राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांची मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीम. शितल देशमुख यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.

१)निवडणूकीच्या कालावधीमध्ये राजकीय पक्षांनी ज्या परवानग्या घेणे आवश्यक आहेत, त्याविषयीची चर्चा करण्यात आली. "एक खिडकी" योजनेतून परवानग्या कशा घ्यावयाच्या याविषयी माहिती देण्यात आली.

२) राजकीय सभा, प्रचार कार्यालय, तसेच वाहन परवानग्या इत्यादीविषयी माहिती देण्यात आली.

३) EVM मशीनबद्दल माहिती देण्यात आली. निवडणूक मतदानयंत्र स्ट्रॉंगरुममध्ये ठेवण्यात येतील, त्यांची हाताळणी व प्रशिक्षण इत्यादीविषयी माहिती देण्यात आली.

४) EVM मशीन संबंधी स्ट्रॉंगरुम, मशीन सिलींग, या सर्व प्रक्रियेमध्ये राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांना उपस्थित राहता येईल याची माहिती दिली.

५) मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर EVM मशीन निवडणूक निर्णय अधिकारी यांचे स्ट्रॉंगरुममध्ये ठेवल्या जातात व मतमोजनीसाठी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची उपस्थिती असावी, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

६) २३ जानेवारी रोजी प्रसिध्द झालेल्या मतदार यादी व पुरवणी यादी या अन्वये मतदान होईल.

७) VIP Voters चे महत्व सांगण्यात आले. त्याविषयी चर्चा करुन नावे पडताळणी करण्याचे आवाहन करण्यात आले.

८) निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे पोस्टल बॅलेट ही प्रक्रिया काय असते, याविषयीची चर्चा करण्यात आली व त्यासंबंधी माहिती देण्यात आली.

९) पोलींग एजंट नेमणूक कशी करावी ? किती पोलींग एजंट असावेत, पोलींग एजंटचे नाव मतदार यादीत असावे, याविषयीची माहिती देण्यात आली, त्यासाठी कोणते पुरावे त्याच्याकडून घ्यावेत, याविषयी चर्चा करण्यात आली.

१०) निवडणूक आचारसंहितेदरम्यान मतदारसंघात असणारे चिन्ह, फोटो, बॅनर, याविषयीची असणारी आचारसंहिता काय असते, या विषयी माहिती देण्यात आली. तसेच आचारसंहितेचे पालन करणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सहा. निवडणूक निर्णय अधिकारी १४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघ

(डॉ. आशिषकुमार बिरादार)
अति. सहा. निवडणूक निर्णय अधिकारी
२५ ठाणे लोकसभा मतदार संघांतर्गत
१४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघ